हर नगर ग्राम में
दीप से दीप जलाएंगे।

# राष्ट्रीय सर्वांगीण ग्रामविकास संस्था

द्वारा श्री. अनिल व्यास, अ/१, केशर सोसायटी, पौड रोड, पुणे - ४११ ०३८
दूरध्वनी : ०२०-२५४६ ४६ ६१. भ्रमणध्वनी : ९४२२३-६६७१४
नोंदणी क्र. : एफ/११५४६/पुणे

**अध्यक्ष**
श्री. मोहनराव घैसास

**उपाध्यक्ष**
श्री. श्रीकांत गोगटे

**कोषाध्यक्ष**
श्री. कुमार आठवले

**कार्यवाह**
श्री. अनिल व्यास

**सदस्य**
सौ. पूनम मेहता
सौ. बीना सप्रे
श्री. मिलिंद देशपांडे
डॉ. द. र. बापट
डॉ. अनिल पत्की
श्री. बाळासाहेब गायकवाड

दि : १५ मे २००९

मा. संपादक,

साप्ता. विवेक

कृपया खालील बातमी सकाळच्या मुक्तपीठात छापावी. ही विनंती.

आपला,

अनिल व्यास
सचीव

## लग्न समारंभ....समर्पण सोहळा

**संस्थेविषयी थोडेसे....**

राष्ट्रीय सर्वांगीण ग्रामविकास संस्था मुळशी तालुक्यात गेली १५ वर्षे ग्राम विकासाचे काम करत आहे. असदे खोऱ्यात एक शाळा, डोंगरदऱ्यात राहणाऱ्या मुलांसाठी दोन मुलांची व एक मुलींचं वसतीगृह, बंधारे, शेती प्रशिक्षण, बचतगट, व्यवसाय विद्यालय, दवाखाना, संस्कार वर्ग. असे अनेक प्रकल्प सुरु आहेत. ग्रामविकासातून ही संस्था राष्ट्रीय संस्कार, चारित्र्य, जीवनमूल्य रुजविण्याचे काम करत आहे. आज ग्रामीण भागातील कार्यकर्त्यांची दुसरी फळी तयार होत आहे.

**त्रिमूर्ति : महेश-रमेश-शेखर**

जे विद्यार्थी वसतीगृहात लहानाचे मोठे झाले आता मुळशी तालुक्यात राहून व्यवसाय, नोकरी, शेती सांभाळत स्थिरावली. त्यापैकी महेश मोहोळ (मुठा गाव), शेखर म्होकर (बोतर वाडी) आणि रमेश आदमाने (आंदगाव). तिघांची परिस्थिति बेताचीच. वसतीगृहामुळे त्यांची शिक्षण झाली. संस्थेमुळे आणि रा. स्व. संघामुळे उत्तम संस्कार आणि सामाजिक जाणीव निर्माण झाली. त्यातूनच संस्थेच्या माध्यमातून समाजात काम करायचा विचार पुढे आला.

**महेश मोहोळने** घरी न जाता मुलांच्या वसतीगृहात दोन वर्ष रहायचं ठरवलं. संस्थेने मानधन देऊ केले ते घेतले नाही. आज महेश संस्थेच्याच असदे येथील स्वामी विवेकानंद विद्यालयात नोकरी करून मुलांना घडविण्याच काम करत आहे.

**रमेश आदमाने** घरची परिस्थिती नसतानाही दोन वर्ष लातूरला सेवाव्रती गेला. त्याच्या लग्नात रमेशची आई म्हणते माझा मुलगा मी या राष्ट्राला दिला.

**शेखर म्होकरने** मुळशी तालुक्यातच राहून स्वतःच्या शेतात प्रयोग केले. नंतर आपल्या गावातल्या शेतकऱ्यांना प्रयोग यशस्वी करून दाखविले. आज तो शेती प्रशिक्षणावर भर देऊन आतापर्यंत ३०० शेतकऱ्यांना त्यांच्या शेतातून मिळत असलेल्या उत्पन्नात त्याने दुप्पट वाढ करून दिली. आज तो सुयश ट्रस्टमधे नोकरी करून मुळशीत व ठाणे जिल्ह्यात शेतकऱ्यांना शेती प्रशिक्षण देत आहे.

**अभिमानानं ऊर भरून आला.**

आज या तिघांची लग्न ठरली. लग्नात तिघांनी हुंडा घेतला नाही. संस्थेने देऊ केलेले मानधन बँकेत ठेवले होते. पुढे त्यांच्याच उपयोगी हे पैसे येतील. संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी त्यांना सांगितले की तुमची लग्न ठरली आहेत. तुम्हाला पैसे लागतील. तुमचेच मानधन आज व्याजधरून जवळजवळ ३० हजार रु. झाले आहेत. त्यावर तिघांनीही सांगितले की आम्ही हे पैसे घेणार नाही. ते तुम्ही जिल्ह्यातल्या चांगल्या सामाजिक संस्थेला देऊन टाका. संस्कारांचा परिणाम काय असतो हे अशा घटनांमधुन कळतो. एकीकडे आज प्रचंड पैसा कमविणारी तरुणाई व्यसनाधिन, भ्रष्टाचारी, बारबालांवर पैसे उधळणारी, रेव पार्ट्या करणारी अशी उदाहरण आपण पाहतो.

आम्ही सर्व धन्य झालो. इतक्या वर्षांच्या कार्याचे सार्थक झाल्यासारखे वाटते. अभिमानानं ऊर भरून आला. तिघांच्याही लग्न समारंभात लग्न लागायच्या आधी हा समर्पण सोहळा केला. हा सर्व निधी संघपुरस्कृत 'मंगलनिधी' या संस्थेला सुपूर्त केला. खरचं आपण जे पेरतो तसेच उगवते.

**प्रदीप पाटील**
रा.स.ग्रा.संस्था-प्रकल्प समन्वयक
९४२१४ ४३६५४